**नियमित दिवाणी दावा क्र. २५१/२०२१**
**निशाणी क्रमांक ४६ लगत**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. ०१ चा उलट तपास प्रतिवादींतर्फे वकील श्री. एम.व्ही. साठे यांच्यामार्फत शपथेवर सुरु –</u>**

**२.** माझ्या वडिलांचे नाव शाहुजी संभाजी कांबळे असे आहे. माझे वय अंदाजे ७० वर्ष एवढे असुन ओळखपत्रानुसार ८५ वर्ष वय आहे. मला लिहिता वाचता येत नाही. मला तीन भाऊ असुन तीन बहिणी आहेत. माझ्या भावाचे नाव–विठ्ठल, किसन व भिमा असे आहे. प्रतिवादी क्रं. १ व ४ हे माझे सख्खे भाऊ आहेत.

**३.** माझ्या पुराव्याच्या शपथपत्रात मजकुर शेतासाठी लिहीले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमचे वडील काबाडकष्ट करुन आम्हा सर्व भावा–बहिणींचे पालनपोषण केलेले आहे. प्रतिवादी क्रं. ४ हा माझ्या पेक्षा लहान आहे. परंतु तो किती वर्षाने लहान हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी व माझे सर्व भाऊ व बहिणी हे एकाच कुटुंबातील सदस्य आहोत. हे म्हणणे खरे नाही की, भुकंपाच्या अगोदरपर्यंत आम्ही सर्व एकत्र कुटुंबात राहत होतो.

**४.** दावा मिळकतीच्या उत्तरेस भागवत मोरे हे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, या दाव्यापुर्वी मी माझ्या भावाविरुध्द निरंतर मनाई हुकुमाचा दावा दाखल केला होता. हे मला माहिती नाही की, सदर दावा खारीज करण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, तहसीलदार यांच्या आदेशान्वये दावा मिळकतीचा फेरफार झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर फेरफार हा शाहुजी यांच्या नावे झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, मयत भिमा याच्याकडे दोन बैल व बैलगाडी होती. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही माझे वडील व भाऊ भिमा हे कसत होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील भुकंपात वारल्यानंतर दावा मिळकत मी चार ते पाच वर्ष कसत होतो. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीतील उत्पन्न आम्ही चार भाऊ चार हिस्सात वाटुन घेत होतो.

**५.** हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही माझ्यानंतर प्रतिवादी क्रं. १ कसतात. हे म्हणणे खरे आहे की, माझी पत्नी व प्रतिवादी क्रं. १ यांच्यामध्ये शाब्दीक बाचाबाची

शेतामध्ये झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रतिवादी क्रं. १ यास 'तुम्ही माझ्या पत्नीसोबत भांडण केले आता मी तुम्हाला जमीन देत नाही' असे म्हणालो.

**६.** हे म्हणणे खरे नाही की, तहसीलदार यांचा सिलींगबद्दलचा आदेश मी पाहिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे तहसीलदार यांचा सिलींगचा आदेश नाही. हे म्हणणे खरे आहे की, तहसीलदार यांचा सिलींगचा आदेश मी अभिलेखावर दाखल केलेला नाही.

**७.** मला दावा मिळकत कसण्यापासुन अडवणुक केली, तेंव्हापासुन दावा मिळकत ही पडीक आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही सिलींगमध्ये माझ्या वडिलांना मिळाली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी तलाठयाशी संगनमत करुन दावा मिळकतीच्या सन १९७७ सालच्या ७/१२ उता–यावर खाडाखोड करुन माझ्या वडिलांचे नाव खोडले.

**८.** हे म्हणणे खरे नाही की, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांच्याकडे फेरफार दुरुस्तीबाबत अर्ज केल्याचे मी माझ्या पुराव्याच्या शपथपत्रात खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर फेरफार दुरुस्तीबाबतच्या अर्जाची प्रत अभिलोखावर दाखल केलेली नाही.

**९.** मला शासनाने प्रतिबंधीत मालक सन १९७६ साली घोषित केले होते. मला सदर प्रतिबंधीत मालक म्हणुन मौजे उमरगा येथे शासनाने घोषित केले होते. मला लेखी स्वरुपात प्रतिबंधीत मालक म्हणुन शासनाने घोषित केले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर मालक घोषित केलेबाबतचे कागदपत्र मी अभिलेखावर दाखल केले नाही. साक्षीदार स्वतः सांगतो की, त्याबाबतची यादीची छायांकित प्रत दाखल केली आहे.

**१०.** महसुल कर्मचारी यांनी फेरफारमध्ये नावाची नोंद चुकीने झाल्याबाबत माझ्यासमक्ष दुरुस्ती करण्याच्या सुचना कोणत्या तारखेला दिल्या होत्या त्याची तारीख व कोणत्या अधिकारी यांनी दिले त्याचे नाव मला सांगता येणार नाही. हे मला आठवत नाही की, सदर सुचना लेखी दिल्या होत्या व तोंडी दिल्या होत्या.

**११.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील मजकुर माझ्या विधीज्ञानी लिहिला असुन त्याबाबत मला काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे

की, गुलाब कांबळे हा माझा मुलगा असुन तेजाबाई ही माझी मुलगी आहे. प्रतिवादी मला अडवणुक करीत असल्याबाबत मी गावातील कोणत्या प्रतिष्ठीत व्यक्तींना सांगितले होते, त्यांची नावे मला सांगता येणार नाहीत.

**१२.** हे म्हणणे खरे आहे की, माझे व माझ्या भावामध्ये वाटण्या झाल्या नाहीत. साक्षीदार पुन्हा सांगतो की, वाटण्या झाल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या भावाना कोणतीही जमीन न देता सर्व जमीन मी हडप करावी अशी माझी इच्छा आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचा मी मालक व कब्जेदार असल्याबाबत मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीवर माझा व प्रतिवादींचा संयुक्तीक कब्जा आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १६/०९/२०२१ रोजी प्रतिवादींनी हरकत, अडथळा केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, फेरफार दुरुस्तीबाबत अर्ज केल्याचे मी शपथपत्रात खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटे कागदपत्रे दाखल केलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, खोटे पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Shyam Shrinivas Kalaskar

Digitally signed by Shyam Shrinivas Kalaskar
Date: 2025.02.10 17:28:01 +0530

दिनांक १०/०२/२०२५.

(एस.एस. कळसकर)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, लोहारा.